MHLA050002782020

विशेष दिवाणी दावा क्र. १३/२०२०
शिवाजी वि. बालाजी वगैरे

## आदेश नि.क्र. ३४ वर

प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी हा अर्ज दाखल करुन या प्रकरणी त्यांना कैफीयत देण्यास झालेला विलंब माफ करण्याची मागणी केली आहे.

२. या अर्जावर वादीने म्हणणे देऊन अर्जास तीव्र आक्षेप घेऊन अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली आहे.

३. दोंन्ही बाजुच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादींच्या वकिलांचे म्हणणे असे की, प्रतिवादींना वेळेत कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने तसेच कोरोना काळामध्ये टाळेबंदी असल्याने त्यांना वेळेत कैफीयत दाखल करत आली नाही. त्यांनी केलेला उशिर हा जाणुन–बुजून केलेला नाही. या दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यासाठी कैफीयत दाखल करण्यास झालेला उशिर माफ करण्यात यावा. वादीच्या वकिलाचे म्हणणे असे की, प्रतिवादींनी विलंबाचे संयुक्तिक कारण अर्जात नमुद केलेले नाही. कायदयाप्रमाणे निश्चित केलेल्या मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही.

४. सदरचा दावा हा नुकसान भरपाई मिळण्यासाठी दाखल केला असल्याने त्यामधील वादीचे कायदेशीर हक्क ठरवण्यासाठी या दाव्याचा निर्णय गुणदोषावर होणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादींना कैफीयत देण्यास झालेला विलंब माफ केल्यास वादाचा पुर्णपणे निपटारा होण्यास मदत होणार आहे. यामध्ये वादीचे कांहीही नुकसान होणार नाही. परंतु झालेल्या या मोठया

विलंबामुळे प्रतिवादींचा अर्ज मंजूर करतांना खर्च बसवणे योग्य होईल. म्हणून मी खालील आदेश देतो.

**आदेश**

प्रतिवादी क्र.१ व ३ यांना कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब वादींना रक्कम रूपये १००/– खर्च देण्याच्या अटीवर माफ करण्यात आला आहे.

**(प्र. अ. सवदीकर)**

दि.२५/०१/२०२२.

दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
अहमदपूर जिल्हा लातूर